कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (I.O.D.)

जा.क्र.कडोंमपा/नरवि/बांप/डोंवि/ ९७-२६
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण
दिनांक:- 20/5/05

श्री./~~श्रीमती~~ :- बाबू सिताराम भोगरकर व इतर
कुलमुखत्यारपत्रक :- मे. गुरु आशिष कॉर्पोरेशनचे भागीदार श्री. हितेश एच. पटेल
वास्तुशिल्पकार:- श्री. वी. एस. वैद्य.

विषय:- स.नं. 20, 29/1/1, हि.नं. 29/1/2 ~~सि.स.नं.~~ 27 1पै, 1पै.

प्लॉट नं. — मौजे- गोरीपाडा येथे बांधकाम करण्याच्या मंजूरीबाबत

संदर्भ:- १) आपला दि. 8.7.05 रोजीचा श्री. वी. एस. वैद्य. वास्तुशिल्पकार, यांचे मार्फत सादर केलेला अर्ज क्र. 110070000180
२) ना.जू.क.धा.आदेशपत्र क्र. मुएक्सी/मुएक्स/1/(8)/एलएआर/ 84+74 दि 30.6.07
मुएक्सी/मुएक्स/1/(8)/एलएआर/ 72 बाबत गोरीपाडा दि 16.1.08
महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ अन्वये

~~सि.स.नं.~~ 20, 29/1/1, 29/1/2 ~~स.नं.~~ 27 1पै, 1पै हि.नं. —
प्लॉट नं. — मौजे गोरीपाडा मध्ये 603.90 चौ.मी.

भुखंडाचा विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि. 8-7-05 च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या 603.90 चौ.मी. जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे ~~कंपाउंड~~, ~~तळ मजला~~, ~~पहिला मजला~~, ~~दुसरा मजला~~, ~~तिसरा मजला~~, ~~चौथा मजला~~, ~~पाचवा मजला~~, ~~सहावा मजला~~, ~~सातवा मजला~~, ~~रहाण्यासाठी~~, ~~दुकाने~~, ~~ऑफीस~~, वाडे-भिंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, जागेवर मूलभुत सुविधा विकसित करण्यासाठी व बिनशेती वापर परवानगी मिळण्यासाठी अंतरिम स्वरुपाचे मंजूरी पत्र देण्यात येत आहे.इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

इमारत क्र. 1 ते 6 - स्टिल्ट + 10 मजले (रहाणेसाठी)
इमारत क्र. 4, 5 - स्टिल्ट + तळ + 11 मजले (रहाणेसाठी, दुकाने, ऑफीस)

१) हे अंतरिम मंजूरीपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी मंजूरीपत्राचे नूतनीकरण मुदत संपण्याआधी आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास आराखडा अनुषंगाने छाननी करण्यात येईल.
२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरूस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३) बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळणेसाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांजकडून बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी आपणांवर राहिल व बिनशेतीच्या परवानगीची एक सत्यप्रत महानगरपालिकेकडे पाठविणे आवश्यक राहिल.
४) बांधकाम सुरु करण्यापूर्वी क.डों.म.पा.कडून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेणेत यावे.
५) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशांप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटींप्रमाणे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेतलेनंतर करता येईल.
६) वाडेभिंत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे मंजूर नकाशाप्रमाणे वाडेभिंतीचे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे.
७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचे अंतरिम मंजूरीपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.
८) इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफटी) जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहिल.
९) नकाशांत दाखविलेल्या गाळयांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करू नये.
१०) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतूदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहिल.
११) जागेतून किंवा जागेजवळून अतिदाब विद्युतवाहिनी जात असल्यास संबंधित खात्याकडून ना-हरकत दाखला घेतला पाहिजे व त्याची सत्यप्रत या कार्यालयास सादर केली पाहिजे.
१२) जागा महामार्ग किंवा रेल्वे मार्गास सन्मुख/लागून किंवा ३० मी.अंतरापर्यंत असल्यास संबंधित खात्याकडून ना हरकत दाखला घेणे आवयक आहे. व त्याची सत्य प्रत यां कार्यालयास सादर केली पाहिजे.
१३) भूखंडाकडे जाण्या-येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल. अंतरिम मंजूरीपत्र नियोजित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे जाणाऱ्या येणाऱ्या मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल.